# प्रेस नोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतीबंधक विभाग बुलढाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | आलोसे श्री. अजित किसनराव करडेल,वय ४३वर्षे पद– सहायक कार्यक्रम अधिकारी ( कंत्राटी) रोजगार हमी योजना, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा |
| लाच मागणी | २५००/–रुपये तडजोडी अंती १०००/–रुपये |
| लाच स्विकारले | १०००/– रुपये |
| घटनास्थळ | जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात असलेल्या प्रसाधन गृहाचे समोर |
| घटना तारीख | दि.०१.०४.२०२४ |

थोडक्यात हकीकत :– यातील तक्रारदार यांनी दिनांक २७.०३.२०२४ रोजी लाप्रवि बुलढाणा घटकाकडे तक्रार दिली की, यातील आरोपी लोकसेवक यांनी माझे व सोबतचे लाभार्थीचे तुती पिकाचे कुशल निधीच्या बिलाचे फाईलची नोटशिट तयार करुन त्यावर उपजिल्हाधिकारी रो.ह.यो.यांची सही घेवून सदर बिल हे आयुक्त कार्यालय रोजगार हमी विभाग, नागपूर यांचे कार्यालयास मंजुरीस सादर करण्यासाठी असे पाच लाभार्थीचे प्रत्येकी ५००/–रुपये प्रमाणे २५००/–रुपये लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार प्राप्त झाली.

दिनांक २७.०३.२०२४ रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान लोकसेवक श्री.अजित करडेल यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडून व सोबतचे लाभार्थी शेतकरी यांचेकडून तुती पिकाचे कुशल निधीच्या बिलाचे फाईलची नोटशिट तयार करुन त्यावर उपजिल्हाधिकारी रो.ह.यो.यांची सही घेवून सदर बिल हे आयुक्त कार्यालय रोजगार हमी विभाग, नागपूर यांचे कार्यालयास मंजुरीस सादर करण्यासाठी प्रत्येकी ५००/–रु प्रमाणे दोघाचे एकूण १०००/–रु लाच मागणी केली. दिनांक १.०४.२०२४ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात असलेल्या प्रसाधन गृहाचे समोर पंच क्रं.१ यांचेसमक्ष १०००/–रु स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले. त्यावरुन त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन बुलढाणा शहर जि.बुलढाणा शहर येथे गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

मार्गदर्शन :– १. मा. श्री. मारुती जगताप, पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती
२. मा. श्री. अनिल पवार, अप्पर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती

पर्यवेक्षण अधिकारी – श्रीमती शितल घोगरे, पोलीस उपअधिक्षक, लाप्रवि बुलढाणा

कार्यवाही पथक /तपास अधिकारी – श्री महेश भोसले, पोलीस निरीक्षक, लाप्रवि.बुलढाणा श्री.सचिन इंगळे पोलीस निरीक्षक, लाप्रवि.बुलढाणा

एएसआय शाम भांगे, पोहेकॉ विलास साखरे, सुनिल राऊत,पो.ना.विनोद लोखंडे,जगदीश पवार, पोकॉ गौरव खत्री, शैलेश सोनवणे, मपोकॉ. स्वाती वाणी, चापोकॉ. नितीन शेटे, शेख अरशद यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्यरो बुलढाणा कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७२६२–२४२५४८ व टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा यांनी केले आहे.

(श्रीमती शितल घोगरे)
पोलीस उपअधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा

Scanned with CamScanner